# लोकसंख्या नियंत्रणासाठी जागरुकता हवी : संदीप पाटील

■ सकाळ वृत्तसेवा

इस्लामपूर, ता. १२ : "देशातल्या पायाभूत समस्यांचे मूळ लोकसंख्यावाढीमध्ये आहे. त्यामुळे आज आपल्याला अनेक प्रकारच्या आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. लोकसंख्यावाढीचा दर असाच राहिला, तर भविष्यात अधिक बिकट प्रश्नांना सामोरे जावे लागेल. भविष्यकालीन संकटे टाळायची असतील, तर लोकसंख्या नियंत्रणाबाबत जागरुकता वाढवणे गरजेचे आहे," असे प्रतिपादन डॉ. संदीप पाटील यांनी केले.

येथील महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमधील भूगोलशास्त्र विभागातर्फे जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. कला शाखेचे अधिष्ठाता प्रा. एस. आर. नांगरे अध्यक्षस्थानी होते. प्रा. सी. जे. भारसकळे, डॉ. प्रीती खराडे उपस्थित होते. श्री. नांगरे म्हणाले, "एकीकडे भारतातले दरडोई उत्पन्न घटत निघाले आहे आणि दुसरीकडे लोकसंख्येची बेसुमार वाढ होत निघाली आहे. हा तोल बिघडला तर भविष्यात बेरोजगारीचा प्रश्न अधिक बिकट बनवण्याचा धोका आहे."

डॉ. एस. के. माने यांनी स्वागत केले. प्रा. अनिल माळी यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. संभाजी नावडकर यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा. डॉ. अलका पाटील यांनी आभार मानले.

# लोकसंख्या नियंत्रणाबाबत जागरूकता आवश्यक : डॉ. पाटील

जनप्रवास । इस्लामपूर

देशातल्या पायाभूत समस्यांचे मूळ लोकसंख्यावाढीमध्ये आहे. त्यामुळे आज आपल्याला अनेक प्रकारच्या आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. लोकसंख्यावाढीचा दर असाच राहिला तर भविष्यात अधिक बिकट प्रश्नांना सामोरे जावे लागेल. भविष्यकालीन संकटे टाळायची असतील तर लोकसंख्या नियंत्रणाबाबत जागरुकता वाढवणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन डॉ. संदीप पाटील यांनी केले.

येथील महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमधील भूगोलशास्त्र विभागाच्यावतीने जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. कला शाखेचे अधिष्ठाता प्रा. एस. आर. नांगरे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. श्री. नांगरे म्हणाले, एकीकडे भारतातले दरडोई उत्पन्न घटत निघाले आहे आणि दुसरीकडे लोकसंख्येची बेसुमार वाढ होत निघाली आहे. हा तोल बिघडला तर भविष्यात बेरोजगारीचा प्रश्न अधिक बिकट बनवण्याचा धोका आहे. यावेळी प्रा. सी. जे. भारसकळे, डॉ. प्रीती खराडे उपस्थित होते. डॉ. एस. के. माने यांनी स्वागत आणि प्रास्ताविक केले. प्रा. संभाजी नावडकर यांनी पाहुण्यांचा परीचय करून दिला.



**जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त कर्मवीर कॉलेजमधील कार्यक्रमात बोलताना डॉ. संदीप पाटील.**

पुण्य नगरी

# संस्कारक्षम पिढी घडवण्याचे सामर्थ्य शिक्षकांमध्ये

## सरोज पाटील


इस्लामपूर : कर्मवीर कॉलेजमध्ये कार्यशाळेत बोलताना सरोज पाटील.

**इस्लामपूर / प्रतिनिधी**

विविध प्रशिक्षण कार्यक्रमांमधून शिक्षकांना पायाभूत प्रशिक्षण मिळाले आणि अध्यापनात त्याचे योग्य उपयोजन झाले तर, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल. त्यासाठी शिक्षकांनी सतत उपक्रमशील असले पाहिजे, असे प्रतिपादन महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या जनरल सेक्रेटरी सरोज पाटील यांनी केले.

येथील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयातील भूगोल विभागाच्यावतीने आयोजित बी. एस्सी. भाग एक या वर्गाच्या विद्यापीठस्तरीय सुधारित अभ्यासक्रम कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी डॉ. बी. एस. जाधव प्रमुख उपस्थित होते. समारोप सत्राचे प्रमुख पाहुणे डॉ. श्रीकृष्ण गायकवाड होते. यावेळी उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड आणि मॅनेजिंग कौन्सिल सदस्य प्रा. स्मिता पाटील उपस्थित होत्या. कार्यशाळेस भूगोल विषयाचे प्राध्यापक मोठया संख्येने उपस्थित होते. डॉ. एस. के. माने यांनी स्वागत केले. डॉ. प्रीती खराडे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. संभाजी नावडकर यांनी आभार मानले. डॉ. संदीप पाटील, डॉ. अलका पाटील आणि प्रा. अनिल माळी यांनी संयोजन केले.

Sangli Edition Edition
Aug 21, 2024 Page No. 04
Powered by: erelego.com

# शिक्षकांनी उपक्रमशील असणे आवश्यक : पाटील



इस्लामपूर : कार्यशाळेत उद्‌घाटनपर मनोगत व्यक्त करताना संस्थेच्या जनरल सेक्रेटरी सरोज पाटील मंचावर डॉ. बी. एस. जाधव, डॉ. पी. व्ही. गायकवाड, डॉ. संदीप पाटील, प्रा. स्मिता पाटील, डॉ. एस. के. माने.

प्रतिनिधी
इस्लामपूर

संस्कारक्षम पिढी घडवण्याचे सामर्थ्य शिक्षकांमध्ये असते. विविध प्रशिक्षण कार्यक्रमांमधून शिक्षकांना पायाभूत प्रशिक्षण मिळाले आणि अध्यापनात त्याचे योग्य उपयोजन झाले, तर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल. त्यासाठी शिक्षकांनी सतत उपक्रमशील असले पाहिजे, असे प्रतिपादन महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या जनरल सेक्रेटरी सरोज पाटील यांनी केले.

येथील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयातील भूगोल विभागाच्यावतीने आयोजित बी. एस्सी.भाग एक या वर्गाच्या विद्यापीठस्तरीय सुधारित अभ्यासक्रम कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी भूगोलशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी एस जाधव बीजभाषक म्हणून उपस्थित होते.

डॉ.जाधव म्हणाले, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची उद्दिष्टे नजरेसमोर ठेवून अध्यापन केले पाहिजे. शैक्षणिक धोरणाचे मूळ गाभाघटक आणि आपल्या विषयाचा अभ्यासक्रम यांचा समन्वय साधता आला पाहिजे. नव्या शैक्षणिक धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व शिक्षकांनी सतत दक्ष असले पाहिजे.

दिवसभराच्या तीन विविध सत्रात डॉ.दिनेश भंडारे, डॉ.सचिन हुदले आणि डॉ एस.के.माने यांनी मांडणी केली. समारोप सत्राचे प्रमुख पाहुणे मिरज महाविद्यालयातील भूगोलशास्त्र विभाग प्रमुख डॉ. श्रीकृष्ण गायकवाड होते. यावेळी उपप्राचार्य डॉ. पी.व्ही. गायकवाड आणि प्रा.स्मिता पाटील उपस्थित होत्या. कार्यशाळेस शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सातारा, सांगली, व कोल्हापूर जिल्ह्यातील भूगोल विषयाचे प्राध्यापक उपस्थित होते. डॉ. एस.के. माने यांनी स्वागत, प्रास्ताविक केले. डॉ प्रीती खराडे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा.संभाजी नावडकर यांनी आभार मानले.

सकाळ

# शिक्षकांनी सतत उपक्रमशील राहावे

## सरोज पाटील : कर्मवीर महाविद्यालयात भूगोल विषयावर कार्यशाळा

इस्लामपूर, ता. २० : "संस्कारक्षम पिढी घडवण्याचे सामर्थ्य शिक्षकांमध्ये असते. विविध प्रशिक्षण कार्यक्रमांमधून शिक्षकांना पायाभूत प्रशिक्षण मिळाले आणि अध्यापनात त्याचे योग्य उपयोजन झाले, तर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल. त्यासाठी शिक्षकांनी सतत उपक्रमशील असले पाहिजे," असे प्रतिपादन महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या सरचिटणीस सरोज पाटील यांनी केले.

येथील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयातील भूगोल विभागातर्फे आयोजित बी. एस्सी. भाग एकच्या विद्यापीठस्तरीय सुधारित अभ्यासक्रम कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. भूगोलशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी. एस. जाधव बीजभाषक होते.



इस्लामपूर : कर्मवीर कॉलेजमध्ये आयोजित कार्यशाळेत बोलताना सरोज पाटील. शेजारी डॉ. बी. एस. जाधव, डॉ. पी. व्ही. गायकवाड, डॉ. संदीप पाटील, प्रा. स्मिता पाटील, डॉ. एस. के. माने.

ते म्हणाले, "राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची उद्दिष्टे नजरेसमोर ठेवून अध्यापन केले पाहिजे. शैक्षणिक धोरणाचे मूळ गाभाघटक आणि आपल्या विषयाचा अभ्यासक्रम यांचा समन्वय साधता आला पाहिजे. नव्या शैक्षणिक धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व शिक्षकांनी सतत दक्ष असले पाहिजे."

दिवसभराच्या तीन विविध सत्रांत डॉ. दिनेश भंडारे, डॉ. सचिन हुले, डॉ. एस. के. माने यांनी मांडणी केली. समारोप सत्राचे प्रमुख पाहुणे डॉ. श्रीकृष्ण गायकवाड होते. उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड, प्रा. स्मिता पाटील उपस्थित होत्या. कार्यशाळेस शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सातारा, सांगली, कोल्हापूर जिल्ह्यांतील भूगोल विषयाचे प्राध्यापक उपस्थित होते. समन्वयक डॉ. एस. के. माने यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. प्रीती खराडे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. संभाजी नावडकर यांनी आभार मानले. डॉ. संदीप पाटील, डॉ. अलका पाटील, प्रा. अनिल माळी यांनी संयोजन केले.

CS Scanned with CamScanner

बुधवार, दि. २१ ऑगस्ट २०२४

दैनिक जनप्रवास

# शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपक्रमशील असावे : पाटील

**जनप्रवास । इस्लामपूर**

संस्कारक्षम पिढी घडवण्याचे सामर्थ्य शिक्षकांमध्ये असते. विविध प्रशिक्षण कार्यक्रमांमधून शिक्षकांना पायाभूत प्रशिक्षण मिळाले आणि अध्यापनात त्याचे योग्य उपयोजन झाले, तर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल. त्यासाठी शिक्षकांनी सतत उपक्रमशील असले पाहिजे. असे प्रतिपादन महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या जनरल सेक्रेटरी सरोज पाटील यांनी केले.

येथील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयातील भूगोल विभागाच्यावतीने आयोजित बी. एस्सी. भाग एक या वर्गाच्या विद्यापीठस्तरीय सुधारित अभ्यासक्रम कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या.

यावेळी भूगोलशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी. एस. जाधव बीजभाषक म्हणून उपस्थित होते.



■ कर्मवीर कॉलेजमध्ये कार्यशाळेत बोलताना संस्थेच्या जनरल सेक्रेटरी सरोज पाटील मंचावर डॉ. बी. एस. जाधव आदी.

यावेळी डॉ. जाधव म्हणाले, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची उद्दिष्टे नजरेसमोर ठेवून अध्यापन केले पाहिजे. शैक्षणिक धोरणाचे मूळ गाभाघटक, आपल्या विषयाचा अभ्यासक्रम यांचा समन्वय साधता आला पाहिजे. नव्या शैक्षणिक धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व शिक्षकांनी सतत दक्ष असले पाहिजे असल्याचे त्यांनी सांगितीले.

दिवसभराच्या तीन विविध सत्रात डॉ. दिनेश भंडारे, डॉ. सचिन हुदले, डॉ. एस. के. माने यांनी मांडणी केली. मिरज महाविद्यालयातील भूगोलशास्त्र विभागप्रमुख डॉ. श्रीकृष्ण गायकवाड होते. यावेळी उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य प्रा. स्मिता पाटील उपस्थित होत्या.

डॉ.संदीप पाटील, डॉ. अलका पाटील, प्रा. अनिल माळी यांनी या कार्यक्रमाचे संयोजन केले. कार्यशाळा समन्वयक डॉ. एस.के. माने यांनी स्वागत आणि प्रास्ताविक केले. डॉ. प्रीती खराडे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. संभाजी नावडकर यांनी आभार मानले.

दैनिक जनप्रवास

सांगली | ■ गुरूवार, दि. ५ सप्टेंबर २०२४ | ९

# ड्रोन तंत्रज्ञानातील रोजगार संधीचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा : प्रा. नांगरे

जनप्रवास । इस्लामपूर

आधुनिक काळातील ड्रोन तंत्रज्ञान व्यक्तीपासून व्यवसायापर्यंत व शेतीपासून शासनव्यवस्थेपर्यंत सर्वत्र उपयोगात येत आहे. प्रगत टेक्नॉलॉजीमुळे करिअरच्या दृष्टीने व्यवसायवाढीसह नोकरी रोजगाराची नवनवीन क्षेत्रे खुली झाली आहेत. याचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असे अवाहन प्रा. बाजीराव नांगरे-पाटील यांनी केले.



■ कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये ड्रोन टेक्नॉलॉजी हाताळणीचे प्रात्यक्षिक सादर करताना प्रा. बाजीराव नांगरे-पाटील सोबत प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, डॉ. एस. के. माने आदी.

येथील महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमधील भूगोल विभागाने आयोजित केलेल्या 'ड्रोन टेक्नॉलॉजी' विषयावरील कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. प्रभारी प्राचार्य डॉ.नितीन शिंदे यांनी या कार्यशाळेचे उदघाटन केले.

अवधूत पाटील म्हणाले, ड्रोन हा ज्ञान विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या संदर्भातील उपयुक्त अविष्कार आहे. विशेष संशोधनापोटी ड्रोनची निर्मिती झाली आहे. विविध क्षेत्रातील त्याचे बहुविध उपयोजन सर्वांच्याच लक्षात आले असल्याचे त्यांनी सांगितले तसेच त्यांनी प्रत्यक्ष ड्रोन चालवण्याचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना दिले. ड्रोन कशा प्रकारे कार्य करतो, ड्रोनची उपयुक्तता, विविध क्षेत्रातील वाढती मागणी यासंदर्भात त्यांनी माहिती दिली.

यावेळी उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड उपस्थित होते. प्रा. संभाजी नावडकर, प्रा. अनिल माळी यांनी संयोजन सहाय्य केले. डॉ. एस. के. माने यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. प्रीती खराडे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. अल्का पाटील यांनी कार्यशाळेचे समन्वयक म्हणून काम पाहिले. डॉ. संदीप पाटील यांनी आभार मानले.

सकाळ

# ड्रोन टेक्नॉलॉजीमुळे करिअरचे नवे क्षेत्र खुले

## नांगरे-पाटील : 'कर्मवीर'मध्ये कार्यशाळा

**इस्लामपूर, ता. ३ :** ''ड्रोन हा ज्ञान, विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या संदर्भातील उपयुक्त आविष्कार आहे. आधुनिक काळातील ड्रोन तंत्रज्ञान व्यक्तीपासून व्यवसायापर्यंत व शेतीपासून शासन व्यवस्थेपर्यंत सर्वत्र उपयोगात येत आहे. या प्रगत टेक्नॉलॉजीमुळे करिअरच्या दृष्टीने व्यवसायवाढीसह नोकरी-रोजगाराची नवनवीन क्षेत्रे खुली झाली आहेत. त्याचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा,'' असे प्रतिपादन प्रा. बाजीराव नांगरे-पाटील यांनी केले.

येथील महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमधील भूगोल विभागाने आयोजित केलेल्या 'ड्रोन टेक्नॉलॉजी' या विषयावरील कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. प्रभारी प्राचार्य डॉ. नितीन शिंदे यांनी कार्यशाळेचे उद्घाटन केले.

अवधूत पाटील यांनी प्रत्यक्ष ड्रोन चालवण्याचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना दिले. ड्रोन कशा प्रकारे कार्य करतो, ड्रोनची उपयुक्तता, विविध क्षेत्रातील वाढती मागणी यासंदर्भात त्यांनी माहिती दिली. उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड उपस्थित होते. डॉ. एस. के. माने यांनी स्वागत आणि प्रास्ताविक केले. डॉ. प्रीती. खराडे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. अलका पाटील यांनी कार्यशाळेचे समन्वयक म्हणून काम पाहिले. डॉ. संदीप पाटील यांनी आभार मानले. नावडकर, यांनी संयोजन सहाय्य केले.

सांगली, गुरुवार, ५ सप्टेंबर २०२४

# ओझोन थराचे संवर्धन काळाची गरज : डॉ. माने

**जनप्रवास । इस्लामपूर**

सूर्याच्या हानीकारक अल्ट्रा व्हायलेट किरणांपासून ओझोन थर पृथ्वीचे रक्षण करतो. सूर्यापासून निघणाऱ्या किरणांमुळे त्वचेचे विकार उद्भवू शकतात. दिवसेंदिवस वाढणारे प्रदूषण आणि वृक्षतोडीमुळे पृथ्वीच्या वायुमंडलातील हा थर क्षीण होत आहे. संपूर्ण जगासाठी मोठी धोक्याची घंटा आहे. त्यामुळे पृथ्वीवरील सजीव सृष्टीच्या अस्तित्वासाठी ओझोन वायूचे संवर्धन करणे ही काळाची गरज आहे. असे प्रतिपादन डॉ. एस. के. माने यांनी केले.

येथील महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये भूगोलशास्त्र विभागाच्यावतीने आयोजित 'जागतिक ओझोन संरक्षण दिन' कार्यक्रमात 'ओझोन अवक्षय आणि पर्यावरण' या विषयावर डॉ. माने बोलत होते.

पदवी व पदव्युत्तर भूगोलशास्त्र विभागाने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. ओझोन थराबद्दल विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करणे हा या कार्यक्रमाच्या आयोजनामागील हेतू होता. यावेळी विभागातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रा. एस. बी. नावडकर यांनी संयोजन केले. प्रा. अनिल माळी यांनी प्रास्ताविक केले. प्रा. संदीप पाटील यांनी सूत्रसंचालन केले. शेवटी डॉ. प्रीती खराडे यांनी सर्वांचे आभार मानले.

# कर्मवीर महाविद्यालयात संविधान दिन

**इस्लामपूर :** येथील महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयातील पदवी, पदव्युत्तर भूगोल विभागामार्फत संविधान दिनाचे आयोजन केले. यावेळी उपस्थित सर्व विद्यार्थी व प्राध्यापक यांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले. भूगोल विभागप्रमुख डॉ. एस. के. माने यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना भारतीय संविधानाची निर्मिती, इतिहास आणि वैशिष्ट्ये याबद्दल मार्गदर्शन केले. डॉ. एस. के. माने यांनी भारतीय संविधानाने आपल्या सर्वांना लोकशाही पद्धतीने विकासाची संधी दिली असून संविधनामुळेच आपला देश आज भक्कमपणे टिकून प्रगती करत आहे, असे प्रतिपादन केले. संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन डॉ. अलका पाटील यांनी केले. डॉ. प्रीती खराडे यांनी प्रास्ताविक केले. प्रा अनिल माळी यांनी आभार मानले.

# युवकांसाठी रिमोट सेन्सिंग तंत्रज्ञानात रोजगाराच्या भरपूर संधी

## डॉ. सुभाष कारंडे

**इस्लामपूर / प्रतिनिधी**

रिमोट सेन्सिंग तंत्रज्ञानात रोजगाराच्या भरपूर संधी असून युवकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. सुभाष कारंडे यांनी केले.



**इस्लामपूर : डॉ. सुभाष कारंडे यांचे स्वागत करताना उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड.**

कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात एक दिवसीय कार्यशाळेप्रसंगी ते बोलत होते. उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड अध्यक्षस्थानी होते. दुसऱ्या सत्रात डॉ. एस. व्ही. कोळेकर यांनी फोटोग्रामेट्री आणि डिजिटल इमेज प्रोसेसिंग यासंदर्भातील प्रात्यक्षिकांचे प्रशिक्षण उपस्थित विद्यार्थ्यांना दिले. कार्यशाळेचे आयोजन भूविज्ञान विभागामार्फत करण्यात आले. स्वागत विभाग प्रमुख डॉ. एस. के. माने यांनी केले. संयोजन प्रा. हिना गवंडी यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. अलका पाटील यांनी करुन दिला. आभार डॉ. प्रीती खराडे यांनी मानले.

सकाळ



**इस्लामपूर** : कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात डॉ. सुभाष कारंडे यांचे स्वागत करताना उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड. सोबत डॉ. एस. के. माने, डॉ. एस. व्ही. कोळेकर, प्रा. हीना गवंडी.

# रिमोट सेन्सिंग तंत्रज्ञानात रोजगाराच्या भरपूर संधी

## डॉ. कारंडे : कर्मवीर महाविद्यालयात कार्यशाळा

**इस्लामपूर, ता. ४ :** रिमोट सेन्सिंग तंत्रज्ञानात रोजगाराच्या भरपूर संधी असून युवकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. सुभाष कारंडे यांनी केले. कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर भूगोलशास्त्र विभागामार्फत आयोजित 'फोटोग्रामेट्री, रिमोट सेन्सिंग आणि डिजिटल इमेज प्रोसेसिंग' या विषयावरील एक दिवसीय कार्यशाळेत साधन व्यक्ती म्हणून मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

भूगोलशास्त्रातील विविध आधुनिक तंत्रापैकी रिमोट सेन्सिंग हे एक अत्यंत महत्त्वाचे तंत्रज्ञान असून सध्याच्या माहिती व तंत्रज्ञानाच्या युगामध्ये तरुणांना या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत. यासंदर्भात प्रशिक्षण देणाऱ्या अगदी मोजक्याच संस्था असून प्रशिक्षित युवकांना अनेक खाजगी संस्थांमध्ये नोकरीची संधी या तंत्राद्वारे उपलब्ध झाली आहे, असे डॉ. कारंडे यांना सांगितले. कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात डॉ. एस. व्ही. कोळेकर यांनी फोटोग्रामेट्री आणि डिजिटल इमेज प्रोसेसिंग यासंदर्भातील प्रात्यक्षिकांचे प्रशिक्षण उपस्थित विद्यार्थ्यांना दिले.

उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड अध्यक्षस्थानी होते. कार्यशाळेचे आयोजन भूविज्ञान विभागामार्फत करण्यात आले. विभागप्रमुख डॉ. एस. के. माने यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रा. हीना गवंडी यांनी संयोजन केले. डॉ. अलका पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. प्रीती खराडे यांनी आभार मानले.

विद्यार्थी.

# मातीची गुणवत्ता राखणे हे अधिक जिकीरीचे

**एस. बी. गायकवाड**

इस्लामपूर / प्रतिनिधी

वाढत्या पर्यावरण असंतुलनामुळे जमिनीवर आमुलाग्र दुष्परिणाम होत आहेत. मातीची गुणवत्ता बिघडल्याने शेतीवर गंभीर परिणाम होत आहेत. त्यामुळेच मातीची गुणवत्ता राखणे हे अधिक जिकीरीचे झाले असे, असे प्रतिपादन प्रा. डॉ. एस. बी. गायकवाड यांनी केले.

कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात जागतिक मृदा दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्य नितीन शिंदे यांनी भूषविले.




इस्लामपूर : जागतिक मृदा दिन कार्यक्रमात बोलताना प्रा. डॉ. एस. बी. गायकवाड, प्रा. अलका पाटील, प्रा. नावाडकर व इतर.

गायकवाड म्हणाले, आपली शेती, अन्न आणि हवामान संतुलनासाठी माती अत्यंत महत्त्वाची आहे. जगातील सुमारे ९५ टक्के अन्न मातीवर अवलंबून आहे. अन्न सुरक्षा आणि आर्थिक विकासासाठी जमिनीची सुपिकता राखणे आवश्यक आहे. भारतातील सॉईल हेल्थ कार्ड योजना सारखे उपक्रम हे मातीची गुणवत्ता राखण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल आहे.

डॉ. एस. के. माने व प्रा. संभाजी पाटील यांनी या कार्यक्रमाचे संयोजन केले. प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय डॉ. अलका पाटील यांनी करून दिला. डॉ. प्रीती खराडे यांनी आभार मानले.

# सांगलीत शिवप्रतिष्ठानच्यावतीने

# उपक्रमशील शिक्षक संदी

लोकमंथन

# भूगोल समाजभान जपणारा विषय : प्रा. डॉ. सुधीर इंगळे

**इस्लामपूर / प्रतिनिधी :** यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, केबीपी महाविद्यालय, आणि मालती वसंतदादा पाटील महाविद्यालय, इस्लामपूर यांच्या भूगोल विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'भूगोल दिन सप्ताह-जिओ फेस्ट २०२५' या कार्यक्रमाचे उद्घाटन दि. १४ जानेवारी रोजी यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात उत्साहात झाले.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेले प्रा. डॉ. सुधीर इंगळे (फलटणच्या मुधोजी महाविद्यालयाचे माजी भूगोल विभाग प्रमुख) यांनी आपल्या प्रेरणादायी भाषणातून भूगोल हा समाजभान जपणारा विषय असल्याचे अधोरेखित केले. ते म्हणाले, भूगोल आपल्याला पर्यावरणाचे रक्षण, नैसर्गिक साधन संपत्तीचा योग्य वापर आणि शाश्वत विकासाच्या दिशेने मार्गदर्शन करणारा विषय आहे. समाजातील भौगोलिक बदल समजून घेतल्याशिवाय प्रगती शक्य नाही.




कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. एम. जाधव होते. भूगोल विभागप्रमुख प्रा. डॉ. सचिन हुदले यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. त्यांनी या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना भूगोलविषयक जागरूकता निर्माण करणे व समाजासाठी महत्त्वाचे भौगोलिक प्रश्न समजून घेण्याची संधी उपलब्ध करून देणे असल्याचे सांगितले. तसेच भूगोल सप्ताहानिमित्त घेण्यात येणाऱ्या वेगवेगळ्या उपक्रमांची माहिती विद्यार्थ्यांना दिली.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. भाग्यश्री पवार यांनी केले. यावेळी प्रा. के. बी. पाटील, प्रा. डॉ. हेमंत सावंत, प्रा. अभय पाटील, प्रा. डॉ. अलका पाटील, प्रा. संदीप पाटील, प्रा. डॉ. प्रीती खराडे, आणि प्रा. अनिल माळी यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. गणेश स्वामी यांनी केले.

दैनिक जनप्रवास

# कर्मवीर कॉलेजमध्ये भूगोल दिनानिमित्त रांगोळी प्रदर्शन

**जनप्रवास । इस्लामपूर**

येथील महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात भूगोल दिनानिमित्त रांगोळी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले.

महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर भूगोलशास्त्र विभागामार्फत आयोजित प्रदर्शनात यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालय आणि केबीपी कॉलेजमधील विद्यार्थी सहभागी झाले. भूगोल व पर्यावरणाशी निगडित विविध विषय विद्यार्थ्यांनी रांगोळीतून रेखाटण्याचा प्रयत्न केला.

पाणी बचत, पृथ्वी वाचवा, मुलगी वाचवा, ओझोन थर संरक्षण, मृदा संवर्धन, जैवविविधता, पर्यावरण प्रदूषण या विषय जनजागृतीसाठी स्पर्धेतील सहभागी विद्यार्थ्यांनी निवडले. प्रथम तीन क्रमांकास प्रमाणपत्र व पारितोषिक दिले. प्राचार्य डॉ. नितीन शिंदे यांनी प्रदर्शनाचे उद्घाटन केले. उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड, डॉ. एस. के. माने उपस्थित होते. डॉ. अलका पाटील यांनी संयोजन केले.

दैनिक जनप्रवास

# कर्मवीर कॉलेजमध्ये भूगोल दिनानिमित्त रांगोळी प्रदर्शन

**जनप्रवास । इस्लामपूर**

येथील महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात भूगोल दिनानिमित्त रांगोळी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले.

महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर भूगोलशास्त्र विभागामार्फत आयोजित प्रदर्शनात यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालय आणि केबीपी कॉलेजमधील विद्यार्थी सहभागी झाले. भूगोल व पर्यावरणाशी निगडित विविध विषय विद्यार्थ्यांनी रांगोळीतून रेखाटण्याचा प्रयत्न केला.

पाणी बचत, पृथ्वी वाचवा, मुलगी वाचवा, ओझोन थर संरक्षण, मृदा संवर्धन, जैवविविधता, पर्यावरण प्रदूषण या विषय जनजागृतीसाठी स्पर्धेतील सहभागी विद्यार्थ्यांनी निवडले. प्रथम तीन क्रमांकास प्रमाणपत्र व पारितोषिक दिले. प्राचार्य डॉ. नितीन शिंदे यांनी प्रदर्शनाचे उद्घाटन केले. उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड, डॉ. एस. के. माने उपस्थित होते. डॉ. अलका पाटील यांनी संयोजन केले.

सकाळ TODAY
सांगली, शनिवार, १८ जानेवारी २०२५

# कर्मवीर महाविद्यालयात भुगोल दिन उत्साहात

**इस्लामपूर** : येथील महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात भूगोल दिनानिमित्त रांगोळी प्रदर्शन झाले. महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर भूगोलशास्त्र विभागामार्फत आयोजित या प्रदर्शनात यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालय आणि कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमधील विद्यार्थी सहभागी झाले. भूगोल व पर्यावरणाशी निगडित विविध विषय विद्यार्थ्यांनी यावेळी रांगोळीच्या माध्यमातून रेखाटण्याचा प्रयत्न केला. पाणी बचत, पृथ्वी वाचवा, मुलगी वाचवा, ओझोन थर संरक्षण, मृदा संवर्धन, जैवविविधता, पर्यावरण प्रदूषण इत्यादी विषय सहभागी विद्यार्थ्यांनी निवडले.



इस्लामपूर : पोस्टर प्रदर्शनाचे उद्‌घाटन करताना प्रा.सचिन गरुड. समवेत डॉ. संदीप पाटील, डॉ. एस. के.माने, डॉ. सचिन हुदले, डॉ. संदीप पाटील.

# इस्लामपुरात पोस्टर प्रदर्शनाचे उद्‌घाटन

इस्लामपूर, ता. २० : भूगोल दिवसानिमित्त भूगोलशास्त्रविषयक जाणीव जागृती विकसनार्थ आयोजित सप्ताहात येथील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय व मालती वसंतदादा पाटील महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने पोस्टर प्रदर्शन झाले. इतिहास विभागप्रमुख प्रा. सचिन गरुड यांच्या हस्ते उद्‌घाटन करण्यात आले.

तिन्ही कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विविध भौगोलिक विषय आणि समस्यांवर विद्यार्थ्यांनी पोस्टर बनवले. अनेक विद्यार्थ्यांनी नवीन संकल्पना मांडून चांगली पोस्टर बनवली. प्रदर्शनासाठी यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातून प्रा. अभय पाटील, प्रा. डॉ. सचिन हुदले, केबीपी कॉलेजचे भूगोल विभागप्रमुख प्रा. डॉ. एस. के. माने, प्रा. डॉ. संदीप पाटील, डॉ. अलका पाटील, डॉ. प्रीती खराडे, मालती वसंतदादा पाटील महाविद्यालयातील प्रा. के. बी. पाटील, तसेच उपप्राचार्य डॉ. संदीप पाटील उपस्थित होते. प्रा. संभाजी पाटील, प्रा. अनिल माळी यांनी संयोजन केले.

थोडक्यात महत्त्वाचे



इस्लामपूर : पोस्टर प्रदर्शनाचे उद्घाटन करताना प्रा. सचिन गरुड, समवेत डॉ. संदीप पाटील आदी.

## 'केबीपी'मध्ये पोस्टर प्रदर्शन

**इस्लामपूर :** भूगोल दिवसाचा निमित्ताने भूगोल शास्त्रविषयक जाणीव जागृती विकसनार्थ आयोजित सप्ताहात कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय इस्लामपूर, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, इस्लामपूर व मालती वसंतदादा पाटील महाविद्यालय इस्लामपूर यांच्या संयुक्त विद्यमानाने उपक्रमांतर्गत पोस्टर प्रदर्शन घेण्यात आले. या प्रदर्शनाचे उद्घाटन इतिहास विभाग प्रमुख प्रा.सचिन गरुड यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रदर्शनामध्ये तिन्ही कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विविध भौगोलिक विषयावर आणि समस्यावर विद्यार्थ्यांनी पोस्टर बनवले. या सर्वच पोस्टर्सचे एकदिवशीय खुले प्रदर्शन करण्यात करण्यात आले. भूगोल विषयातील विविध संकल्पना यांची पोस्टरच्या माध्यमातून अतिशय सुरेख मांडणी विद्यार्थ्यांनी केली. यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातून प्रा.अभय पाटील, प्रा.डॉ.सचिन हुदले, के.बी.पी.कॉलेजचे भूगोल विभाग प्रमुख प्रा.डॉ.एस.के.माने, प्रा.डॉ.संदीप पाटील, डॉ.अलका पाटील, डॉ.प्रीती खराडे, मालती वसंतदादा पाटील महाविद्यालयाचे प्रा.के.बी.पाटील, उपप्राचार्य डॉ.संदीप पाटील उपस्थित होते. प्रा. संभाजी पाटील, प्रा.अनिल माळींनी संयोजन केले.

दैनिक जनप्रवास




। भूगोल दिन कार्यक्रमात बोलताना प्रा. डॉ. सुधीर इंगळे. सोबत प्राचार्य डॉ. ए. एम. जाधव, प्रा. डॉ. सचिन हुदले, प्रा. के. बी. पाटील, डॉ. हेमंत सावंत.

# भूगोल समाजभान जपणारा विषय : प्रा. डॉ. सुधीर इंगळे

**जनप्रवास । इस्लामपूर**

भूगोल आपल्याला पर्यावरणाचे रक्षण, नैसर्गिक साधनसंपत्तीचा योग्य वापर आणि शाश्वत विकासाच्या दिशेने मार्गदर्शन करणारा आहे. भूगोल हा समाजभान जपणारा विषय आहे. समाजातील भौगोलिक बदल समजून घेतल्याशिवाय प्रगती शक्य नाही. असे प्रतिपादन मुधोजी महाविद्यालयाचे माजी भूगोल विभागप्रमुख प्रा. डॉ. सुधीर इंगळे यांनी केले.

यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, केबीपी महाविद्यालय आणि मालती वसंतदादा पाटील महाविद्यालय इस्लामपूर यांच्या भूगोल विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'भूगोल दिन सप्ताह - जिओ फेस्ट २०२५' या कार्यक्रमप्रसंगी ते बोलत होते. प्राचार्य डॉ. ए. एम. जाधव कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

भूगोल विभागप्रमुख प्रा. डॉ. सचिन हुदले यांनी स्वागत व प्रास्ताविकात भूगोल सप्ताहानिमित्त घेतलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

यावेळी प्रा. के. बी. पाटील, प्रा. डॉ. हेमंत सावंत, प्रा. अभय पाटील, प्रा. डॉ. अल्का पाटील, प्रा. संदीप पाटील, प्रा. डॉ. प्रीती खराडे, प्रा. अनिल माळी यांची उपस्थिती होती. प्रा. गणेश स्वामी यांनी सूत्रसंचालन प्रा. भाग्यश्री पवार यांनी आभार मानले.